**प्रेस नोट ता.३०/०७/२०२३**

# ऑनलाईन शेअर मार्केटींग फ्रोड मधुन फसवणुक झाल्याने आत्महत्यास प्रवृत्त झालेल्या पिडीत महिलेस सुरत येथुन शोधुन सुरक्षीत परत स्वगृही आणले.

## चिखली पोलीस स्टेशनची सुरत, गुजरात येथे कारवाई

ऑनलाईन फ़सवणुकीचे रोज नविन नविन प्रकार समोर येत आहेत. पोलीस यत्रंणा वांरवार नागरिकांना जागरुक करण्याचा प्रयत्न करत असते. फ़सवणुक करणारे ठक सतत नव नवीन पदधतीने लोकांना फ़सवणुक करत आहेत. सदय स्थितीत शेअर बाजारात ऑन लाईन गुंतवणुक केल्यास तात्काळ मोठया रकमेचा फ़ायदा होत असल्याचे अमिष नागरिकांना दिले जाते. प्रथम गुतवणुक करणा-याना लाभ देवुन आकर्षीत केले जाते. तदनंतर पुढील गुतवणुक करण्यास उत्तेजीत केले जाते. गुंतवणुकदारानी अंतीम मर्यादापर्यन्त गुंतवणुक केली की परतावा देणे बंद होते व गुतवणुकदाराची फ़सवणुक होते.

अश्या एका ठकाने महिला नामे सौ.पुनम अरुण काटे, वय ३० वर्ष, धंदा- गृहिणी, रा. ठि. रुपी हौसिंग सोसायटी, दत्तमंदीराजवळ, रुपीनगर, चिखली हिला ऑन लाईन शेअर बाजारात गुंतवणुक करण्यास आकर्षीत केले. सुशिक्षीत असणा-या या महिलेने गुगलवर शेअर बाजाराबाबत  माहिती घेण्याचा प्रयत्न केला होता. त्यानंतर तिला शेअर बाजारात गुंतवणुक केल्यास त्यांना कसा फ़ायदा होईल याबाबतची माहिती देणारे फ़ोन येवु लागले. दि.३०.०७.२०२३ रोजी त्यांना असाच एक फ़ोन आला व त्याने पुनम काटे यांना त्याच्या फ़सवणुकीच्या जाळ्यात अडकवले. प्रथम त्या महिलेले रु.२०००/- गुतवलेले, तिला लगेच एक तासात रु.२५००/- परत मिळाले.  त्यामुळे तिचे गुंतवणुकीचे आकर्षण वाढले.

त्यानंतर त्या ठगाने त्यांना लिंक पाठवुन त्यावर माहिती भरुन त्याचे नावे ऑनलाईन अकाउन्ट ऒपन करण्यास भाग पाडले. पिडीत महिले गुतवणुक केलेली रक्कम व झालेला फ़ायदा हयाची रक्कम त्या अकाउन्टवर दिसत असे. त्यामुळे पिडीत महिला त्या अकाउन्टला बॅकेचे अकाउन्ट सारखे समजुन आपले पैसे सुरक्षीत असल्याचे समजुन गुंतवणुक वाढवत गेली. तिने प्रथम तिचे वडिलाकडुन एक लाख, नंतर पतीकडुन ५० हजार, दिराकडून ५० हजार, बहिणीकडून ५० हजार रुपये व परिचीत व्यकतीकडून ६५ हजार असे एकुण ३,१५,०००/- ची गुंतवणुक दि.३१.०७.२०२३ रोजी केली. परंतू त्यानंतरही ठग हा पुन्हा त्याना परताव्याची रक्कम परत मिळवायची असेल तर अधिक गुंतवणुक करण्यास सांगत होता. सदर महिलेकडे गुतंवणुक करण्यास पैसे नसल्याने त्यानी परताव्याची रक्कम परत मिळवण्याचा प्रयत्न केला असता त्याना परत गुंतवणुक केली तरच परतावा परत मिळेल असे अश्वासन देवुन एक तासात पैसे भरले तरच ते शक्य आहे अन्यथा तुमचे पैसे ब्लॉक होतील असे सांगण्यात येत होते. एक तासात पैसे उपलब्ध न झाल्याने तिचे अकाउन्ट ब्लॉक झाल्याचे तिला सांगण्यात आले.

एकदम एवढया मोठया रकमेची फ़सवणुक झाल्याने महिलेस धक्का बसला. त्यातुन तिला सावरणे कठीण झाले. कारण आयुष्यभर इज्जतीत राहणा-या महिलेस ही बाब पचवणे कठीण झाले. लोकांचे पैसे परत कसे करायचे, आपल्यावर विश्वास असणा-या मानसाच्या विश्वासाला तडा गेला तर त्यांना तोड कसे दाखवायचे या तणावाने दुर जावुन आत्महत्या करण्याचा विचार करुन घर सोडले.

संध्याकाळपर्यन्त नातेवाईकांनी शोध घेवुनही ती मिळुन न आल्याने पोलीस स्टेशनला दिली. महिला आत्महत्या करण्यासाठी जात असल्याचे समजल्याने प्रथम तिला वाचवणे पोलीसांस साठी मोठे अव्हान होते. चिखली पोलीस स्टेशनचे पोलीसांनी तात्काळ तिचे राहते घरापासुनचे सिसिटिव्ही तपासणे सुरु केले. त्यानुसार सदरची महिला दि.३१.०७.२०२३ रोजी सध्याकाळी १८.४५ वा. पर्यन्त आकुर्डी रेल्वे स्टेशन परीसरात आलेली असल्याचे दिसुन आले. महिला तिच्या जवळ असणारा मोबाईल फ़ोन चालु करुन १-२ मेसेज पाठविले की लगेच बंद करत होती.त्यामुळे तिचे लोकेशन पोलीसांना मिळत नव्हते. सध्याकाळी १८.४० वा. तिचा मोबाईल आकुर्डी परीसरात बंद झाला होता. तो रात्री १०.३० वा. लोनावळा परीसरात चालु करुन बंद केल्याचे व त्यानंतर ११.१५ वा. कर्जत परीसरात चालु करुन बंद केलेला आढळुन आले. यावरुन सदरची महिला रेल्वे प्रवास करत असावी असा अंदाज बाधुन चिखली पोलीसांनी मुंबई रेल्वे पोलीसांची मदत घेवुन सदर कालावधीत पुण्याकडुन मुंबईकडे जाणा-या रेल्वेची माहिती घेतली असता त्या वेळेत फ़क्त पुणे- भुज ही एकच रेल्वे त्या मार्गावर असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. त्यानुसार ठाणे व कल्याण रेल्वे स्टेशनवर जिआरपी पोलीसांची मदत घेऊन सदरची रेल्वे तपासण्याचा प्रयत्न केला परंतू सदरची महिला मिळुन आली नाही. त्यानंतरच्या काळात सदर महिलेने पुन्हा मोबाईल चालु करुन बंद केला त्यावेळेस तिचे लोकेशन भिवंडी परीसरातील मिळाले.यावरुन सदरची महिला भुज, गुजरात कडे जाणा-या रेल्वेत असल्याची पोलीसांची खात्री झाली.

तात्काळ चिखली पोलीस स्टेशनचे पोलीसांनी जिआरपी व रेल्वे सुरक्षा दलाची मदत घेऊन पुढील वसई, विरार, पालघर, वापी सहीत गुजरात मधील सर्व रेल्वे स्टेशन यांना अलर्ट केले. तसेच सदरच्या रेल्वेत ड्युटीस असणारे टिसी यांचे नंबर मिळवुन त्याना माहिती दिलेली होती.

दि.०१.०८.२०२३ रोजी पहाटे ०३.३० वा. रेल्वे पोलीस व टिसी ट्रेन तपासत आहेत ही बाब लक्षात आल्याने सदरची महिला सुरत रेल्वे स्टेशन येथे उतरली असता तेथील कर्तव्यावरील जिआरपी पोलीसांनी सदरच्या महिलेस तात्काळ ताब्यात घेतले व चिखली पोलीस स्टेशनला कळविलेवरुन तात्काळ पथक पाठवुन सदरच्या महिलेस ताब्यात घेवुन पुण्यास परत आणुन सुखरुप तिचे घरी नेवुन नातेवाईकांचे ताब्यात देण्यात आले.

पोलीस तात्काळ केलेल्या कारवाईमुळे व इतर यत्रणेचा व तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यामुळे फ़सवणुक झाल्याच्या नैराश्यामधुन आत्महत्या करण्यासाठी गेलेल्या महिलेचा जिव वाचविला म्हणुन तिचे नातेवाईकांनी तसेच स्थानिक नागरिकांनी पोलीसांचे अभार मानले.

सदरची कारवाई पोलीस आयुक्त श्री. विनोय कुमार चौबे, सह पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे, अतिरीक्त पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी सो, पोलीस उप आयुक्त डॉ. काकासाहेब डोळे, सहा. पोलीस आयुक्त श्री. पदमाकर घनवट सो. याच्या मार्गदर्शनाखाली वरीष्ट पोलीस निरीक्षक, श्री. ज्ञानेश्वर काटकर, स.पो.नि. गुमाणे, पोलीस उप निरीक्षक कुमटकर, सहा. पो. उप नि कडलग व वडेकर, पो.ह. ९६२ नागरे, पो.ह. २९३१ तारळकर, पो.ना. १८५६ पिंजारी व गुन्हे प्रगटीकरण शाखेचे पथकाने केलेली आहे. विशेष तांत्रीक सहाय्य पो.ह. नागेश माळी यांनी केले.

(डॉ, काकासाहेब डोळे)
पोलीस उप आयुक्त,
परीमंडळ-२, पिंपरी चिंचवड